**कार्यालय मध्यवर्ती संशोधन केंद्र**
**डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला**
इ-मेल: directorcrs78@gmail.com

जा.क्र. म.सं.के./सामान्य/271 /२०२५ दि. 27/05/२०२५

# निविदा सूचना

**विषय:- सन २०२५-२६ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे विविध फळझाडांची रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करण्यासाठी दर (कोटेशन) बोलविण्यासाठी व्यापक प्रसिद्धी करणेबाबत.....**

वरील विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते कि, मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे विविध फळझाडांची रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करण्यासाठी निविदा दर खालील प्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून मागविण्यात येत असून निविदा मसुदा/निविदेचे स्वरूप सोबत जोडण्यात आलेले आहे.

**अटी व शर्ती**

१. निविदा पत्रक/कोटेशन कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी सकाळी १०.०० ते दुपारी ५.३० या वेळेत स्वीकारल्या जातील.
२. निविदा मसुदा मध्ये नमूद केल्याप्रमाणे दर नमूद करावे तसेच दर सर्व करासह (जीएसटी व इतर करासह) नमूद करावे.
३. निविदेमध्ये halting चार्जेस सुद्धा नमूद करावा जेणेकरून एखाद्या ठिकाणी रात्रभर राहण्याचे काम पडल्यास halting चार्जेस चे देयक काढणे सोयीचे होईल.
४. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता उपरोक्त कामासाठी वाहतूक करतांना विद्यापीठाचे काही नुकसान झाल्यास विद्यापीठ प्रशासनाने ठरवून दिलेल्या निकषाप्रमाणे नुकसान भरपाई संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराकडून वसूल करण्यात येईल.
५. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता वाटिका येथून विविध फळझाडांची रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करण्यासाठी या कार्यालय मार्फत कोणताही मनुष्यबळ मिळणार नाही.
६. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता विविध फळझाडांची रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करण्यासाठी इंधन किंवा इंधनासाठी अग्रिम धनराशी मिळणार नाही.
७. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता उपरोक्त कामासाठी वाहतूक करतांना लागणारा टोल ट्याक्स भरण्याची जबाबदारी संबंधित निविदाधारक /कंत्राटदार यांची राहील.
८. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता उपरोक्त कामासाठी वाहतूक करतांना कुठलीही दुर्घटना/अपघात/जीवितहानी अथवा वाहन बिघाड झाल्यास हे कार्यालय किंवा कोणताही कर्मचारी/अधिकारी किंवा विद्यापीठ जवाबदार राहणार नाही. याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित निविदाधारक/कंत्राटदाराची राहील व त्यावर होणारा खर्च सुद्धा निविदाधारक/कंत्राटदार यांना करावा लागेल.

९. विद्यापीठ प्रशासनाने वेळोवेळी निर्देशित केलेल्या नियमाचे पालन करणे संबंधित निविदाधारकांना बंधनकारक राहील.

१०. नेमून दिलेले काम पूर्ण करण्यात यावे, कामाबाबत काही तक्रार आल्यास किंवा काम अर्धवट राहील्यास सदर कामाचे देयक काढण्यात येणार नाही.

११. देयकावर जीएसटी नंबर असणे अनिवार्य आहे.

१२. निविदाधारक/कंत्राटदारांनी देयक सादर करतेवेळी बँक खाते बाबतची संपूर्ण माहिती सादर करावी, अन्यथा देयक अदा केले जाणार नाही.

१३. मध्यवर्ती संशोधन केंद्र अकोला यांचे करिता उपरोक्त कामासाठी वापरण्यात येणारे वाहन सुस्थितीत, सर्व परवाना मुदतीत असले पाहिजे तसेच वाहन चालकाजवळ सुद्धा वाहन चालकाचा योग्य तो परवाना असणे आवश्य राहील. या संबधी वाहतूक करतांना कुठलीही अडचण आल्यास त्यास निवदाधारक/ कंत्राटदार जबाबदार राहील.

१४. निविदाधारक/कंत्राटदारास देयक काम पूर्ण व विहित वेळेत पूर्ण केल्यावर तसेच संबंधित विभागाचे प्रभारी अधिकारी यांनी काम समाधानकारक झाल्याचे प्रमाणित केल्यानंतरच कामाचे देयक पारित करण्यात येईल.

१५. उपरोक्त करीत असतांना कोणताही वाद विवाद निर्माण झाल्यास सदर वाद विवाद विद्यापीठ विधी विभागाचे अधिकारी/ मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचे समक्ष मिटविला जाईल व अंतिम निर्णय मा. संशोधन संचालक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांचा राहील आणि तो सर्वांना मान्य करणे बंधनकारक राहील.

१६. निविदेतील दर एक वर्षा करिता वैध राहतील.

१७. वरीलप्रमाणे अटी व शर्तीस अधीन राहून सोबत जोडलेल्या निविदा मसुदा तपशिला नुसार दि. ०४.०६.०२०२५ रोजी पर्यंत कार्यालयीन वेळेत निविदा सीलबंद लीफाफामध्ये सादर करावी.

१८. प्राप्त निविदा दि. ०५.०६.०२०२५ रोजी दुपारी ४.०० वा. उघडण्यात येतील याची नोंद घ्यावी.

संचालक
मध्यवर्ती संशोधन केंद्र
डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला

# <u>निविदा (कोटेशन) मसुदा</u>

सन २०२५-२६ मध्ये मध्यवर्ती संशोधन केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला येथे फळरोप वाटिका येथून विविध फळझाडांची रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करण्यासाठी दर (कोटेशन) खालील प्रमाणे आहेत.

कामाचा तपशील : मध्यवर्ती संशोधन केंद्र डॉ. पं.दे.कृ.वि. अकोला यांचेकरिता फळरोप वाटिका येथून विविध फळझाडांची रोपे भाडेतत्वावर वाहनाने वाहतूक करणे

| अ.क्र. | तपशील | वाहन प्रकार | दर (रु.) | वाहतूक | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| १, | स्थानिक | पिक अप | प्रति दिवस | ३०० कि मी. पर्यंत | आंबा, चिकू, संत्रा, मोसंबी, सीताफळ, पेरू, अंजीर, केळी, कवठ, फणस, करवंद, बोर, जांभूळ व इतर फळझाडांची रोपे वाहतूक करणे |
| २. | | ४०७ (मेटाडोर/डीसीएम) | प्रति दिवस | | |
| ३. | | ट्रक | प्रति दिवस | | |
| ४. | | आयशर ट्रक | प्रति दिवस | | |
| ५. | इतर ठिकाण | पिक अप | प्रति किमी | ३०० कि.मी. पेक्षा जास्त | |
| ६. | | ४०७ (मेटाडोर/डीसीएम) | प्रति किमी | | |
| ७. | | ट्रक | प्रति किमी | | |
| ८. | | आयशर ट्रक | प्रति किमी | | |

निविदा सुचनेमधील संपूर्ण अटी व शर्ती मला सर्वस्वी मान्य आहेत.

स्वाक्षरी

ठिकाण:

नाव व संपूर्ण

दिनांक: